Est. Sept 1991

2(f) & 12 (B): March 20[illegible]

Hanuman Shikshan Prasarak Mandal, Sonpeth's

LATE RAMESH WARPUDKAR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, SONPETH. DIST. PARBHANI 431516 (MS)

NAAC Accredited with Grade- B

(Affiliated to: Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

Ph. (02453) 240 142 Fax. (02453)240 142 Principal: 09423 779 000

Web: www.warpudkarcollege.com Email:lrwcsnpt@rediffmail.com./shreyavasant2010@gmail.com

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sopneth Dist.Parbhani (M.S.)

Shri. P.R. Kadam
President

Dr. V.D. Satpute
Principal

# Departmental Activity Report

- Name of the Department: Marathi

1. Name of the Activity: poetry Reading
2. Date: 21/01/2022
3. Place & Time: Marathi Department
4. Objectives of the Programme: To introduce students to lyricism, rhythmic content and poetic features.
5. Guests/Resource Persons: Santosh Narayankar
6. Abstract of the Programme: sung self-written poems
7. Total Beneficiaries: 80
8. Achievements/ Outcomes: The creation process of the poem will be remembered

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित

# कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी

Marathi विभाग /समिती

शैक्षणिक वर्ष : २०२१-२२

| | | |
|---|---|---|
| भाग - अ | | |
| उपक्रम / कार्यक्रमाचे क्रमांक | | 06 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे नाव | | - ~~व्याख्यान~~. कविसंमेलन.<br>- कवी संतोष नारायणकर. |
| दिनांक- | | 21/11/2022 |
| उपक्रम / कार्यक्रमाचे स्वरूप | | कविता वाचन.<br>i) कवी संतोष नारायणकर.<br>ii) ~~डॉ. मनिषा~~ 'कविता बोलते अशी' या विषया अंतर्गत स्वरचित कविता गायन. |
| उद्देश | १ | काव्य निर्मितीची प्रेरणा विद्यार्थ्यांना देणे |
| | २ | कवितेचे प्रकार समजावून सांगणे |
| | ३ | गेयता, लयबद्धता, आशयघनता काव्यवैशिष्ट्ये सांगणे |
| | ४ | अनुभव उत्कटपणे कसे कवितेतून मांडले जातात ते कळणे |
| | ५ | कवि संतोष नारायणगावकर यांच्या कवितेचे स्वरूप |
| प्रमुख पाहुणे / मार्गदर्शक / व्याख्याते | | - संतोष नारायणकर<br>'माझ्या जीवनाचे गाणे' |
| उद्घाटक | | प्राचार्य डॉ. सातपुते ~~श्री~~ |
| ठिकाण | | online Mode |
| उपस्थिती | विद्यार्थी | 45 |
| | कर्मचारी | 20 |
| | इतर | 15 |
| | एकूण | 80 |

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा अंतर्गत पाचवे पुष्प गुंफताना कवी संतोष नारायणकर यांनी कविता बोलते अशी यातील विविध कवितांचे गायन केले "चौथी मध्ये असताना काय करीत असेल आता?" "काळ्यासारी गाडी करावी किंवा सांगू तुला लिहावी चिठ्ठी कितीदा." या कवितेपासून त्यांच्या लेखनाला प्रारंभ झाला.

माय म्हणायची रोज
मुका घेऊन कपाळी
बाळा ज्याची खावी पोळी
त्याची वाजवावी टाळी.

या कवितेतून मायेन दिलेली शिकवण ते सांगतात. 'बाप' या कवितेतून बापान शिकवलेला स्वाभिमान त्यांनी मांडला. माय बाप, साठवण नाही काळीज ना कु, तिच्या दागिन्या जात, मामाची पोरगी, घरात नी काय करत असेल वाचकांच्या दिलाखेचक कवितेचे गायन केले.

अजूनही त्यांनी एकदा मला विचारली होती जात
मी म्हणालो काय सांगू दोन पाय दोन हात

या कवितेतून जातीपेक्षा माणूस हा श्रेष्ठ असल्याचा ते भाव व्यक्त करतात.

या कार्यक्रमाचा लाभ जवळ जवळ ३० श्रोत्यांनी घेतला.

उपक्रम / कार्यक्रमाची उपयुक्तता

* कवितेचे स्वरूप मुलांच्या लक्षात येईल.
* कवितेविषयी आवड निर्माण होईल.
* कवितेची निर्मिती प्रक्रिया लक्षात येईल.
* कवीच्या जीवनातील संघर्षा मुळे जगण्याची प्रेरणा मिळेल
* मानवी मूल्य, मानवतावाद रुजवण्यास मदत होईल

| खर्च कारणदात आलेल्या वस्तूचे विवरण | अपेक्षित खर्च | |
|---|---|---|
| 1000<br>( मानधन )<br>कवी संतोष नारायणराव ... | 1000 | |
| एकूण खर्च | 1000 | |

| अहवाल सादर करणाऱ्या समिती / विभाग | | |
|---|---|---|
| पद | नाव | स्वाक्षरी |
| समिती अध्यक्ष/ विभाग प्रमुख | प्रोफेसर डॉ. काळे बी.एन. | |
| समन्वयक | प्रा. डॉ. पाटील एन. बी. | |
| सदस्य | प्रा. डॉ. बा. ठ. जाधव<br>प्रा. डॉ. कदम एन. बी. | |
| अहवाल सदर केल्याचा दिनांक : 29 / 1 / २०22 | | |

टीप: सोबत कार्यक्रमाचे GEO TAGGED फोटो व वर्तमानपत्रातील वातम्या जोडाव्यात

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

Late Ramesh Warpudkar Arts, Commerce & Science College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

* 'माझ्या जीवनाचं गाणं माझी कविता' – संतोष नारायणकर.

सोनपेठ: येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न होत आहे. त्या प्रसंगी पाचवे पुष्प गुंफताना परभणीच्या मातीतील प्रसिद्ध कवी संतोष नारायणकर यांनी 'कविता बोलते अशी...' या काव्यवाचन प्रसंगी उदगार काढले.

पुढे कविता वाचन करताना ते म्हणाले मी इयत्ता चौथी पासूनच काव्य लेखनाला प्रारंभ केला. आता चौथी मधील लता काय करीत असेल आता, 'कागदासी गट्टी करावी कितीदा सांगू तुला लिहावी चिठ्ठी कितीदा' या कवितेपासून त्यांच्या लेखनाला प्रारंभ झाला.

संतोष नारायणकर यांचा जन्म परळीचा. परळीच्या वातावरणात ते लहानाचे मोठे झाले. घरात अठरा विश्व दारिद्र्य असल्यामुळे काम करतच ते मोठे झाले. बूटपॉलिश पासून ते ऑटो चालक पर्यंत त्यांनी सर्व कामे केली. ही सर्व कामे करत असताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले.

त्यांनी माय, बाप दागिना, जात, मामाची पोरगी, आठवण माझी काढत जा तू, तिच्या घरात ती काय करत असेल, यासारख्या सदाबहार कवितेचे गायन केले. सहजता सुलभता, सोपेपणा व लयबद्धता हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य दिसून आले. सोप्या शब्दातून त्यांनी आपल्या जीवनाचं गाणं मांडलं. आपल्या माय न दिलेली शिकवण सांगताना ते ते म्हणतात

'माय म्हणायची रोज  
मुका घेऊन कपाळी  
बाळा ज्याची खावी पोळी  
त्याची वाजवावी टाळी'

बापानं शिकवलेला स्वाभिमान त्यांनी बाप या कवितेतून मांडला. प्रेम भावना, प्रेम जाणिवा व्यक्त करणाऱ्या त्यांनी अनेक कविता सादर केल्या. 'मामाला माझ्या होत्या दोन पोरी  
एक होती काळी एक होती गोरी'..

या कवितेतून मामा, मामाच्या मुली , त्यांचा लाभलेला सहवास त्यांनी यातून शब्दबंद्ध केला. या कवितेचा आस्वाद घेताना प्रत्येकाला आपला मामा आणि मामाची पोरगी नक्कीच आठवली असेल. त्यांचं पहिलं प्रेम, तिचा लाभलेला सहवास आणि गरीबीमुळे झालेली ताटातूट याचे चित्रण करताना ते म्हणतात-

' तिच्या घरात ती आता काय करत असेल  
थोडी सरत असेल थोडी उरत असेल ...'

अशी प्रेमजाणीव ते व्यक्त करतात. 'आठवण माझी काढत जा तू  
एक लिफाफा धाडत जाऽऽ तू '

PRINCIPAL  
Late Ramesh Warpudkar  
(ACS) College, Sonpeth  
Dist. Parbhani (MS)

यातून त्यांनी प्रेम भावनेला मोकळी वाट करून दिली. दागिना या कवितेतून त्यांची अर्धांगिनी, सहचारिणी प्रेमळ पत्नीची दागिने विषय समजूत काढताना त्यांनी तिचं सौंदर्यही टिपल आहे.

'अंगावर तू काऊन सांग दागिन घातलं

तुझ्या रूपाहून त्यात काय भारीच वाटलं...'

कृत्रिम दागिने पेक्षाही आपली प्रेमळ पत्नी मौल्यवान आहे असे ते सांगतात. पत्नीमुळे आपल्या जीवनाचं झालेलं सार्थक सांगताना ते म्हणतात. 'तू माहेरी गेलीस अन घरात उंदीर झाले

तू परत आलीस घराचे पुन्हा मंदिर झाले' असा भाव व्यक्त करतात.

जात ही भारतीय समाजाचे व्यवच्छेदक लक्षण. याबाबत आलेला अनुभव मांडतांना ते लिहितात

'अशीच त्यांनी एकदा मला विचारली होती जात

मी म्हणालो काय सांगू दोन पाय आणि दोन हात'

या कवितेतून जात, धर्म लिंग, पंथ या पेक्षा माणूस हा श्रेष्ठ असल्याचा, मानव्याचा भाव ते व्यक्त करतात.

त्यांच्या कवितेतील सुलभता, सोपेपणा, नाद सौंदर्य, ग्रामीण शब्दकळा या मुळेच प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव यांनी माझ्या कवितेचा वारसदार संतोष नारायणकर म्हणून त्यांचा गौरव केला आहे.

# माझ्या जीवनाचे गाणे हीच माझी कविता- नारायणकर

**सोनपेठ / प्रतिनिधी**

चौथीत असल्यापासूनच काव्य लेखनाला प्रारंभ केला. आता चौथीमधील लता काय करीत असेल आता, 'कागदासी गट्टी करावी कितीदा सांगू तुला लिहावी चिठ्ठी कितीदा' या कवितेपासून त्यांच्या लेखनाला प्रारंभ झाला. माझ्या जीवनाचे गाणे हीच माझी कविता असल्याचे प्रतिपादन कवी संतोष नारायणकर यांनी केले.

येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न होत आहे. त्याप्रसंगी पाचवे पुष्प गुंफताना कवी संतोष नारायणकर यांनी 'कविता बोलते अशी...'या काव्यवाचन प्रसंगी उद्‌गार काढले. संतोष नारायणकर यांचा जन्म परळीचा. परळीच्या वातावरणात ते लहानाचे मोठे झाले. घरात अठरा विश्व दारिद्र्य असल्यामुळे काम करतच ते मोठे झाले. बूटपॉलिश पासून ते ऑटो चालकापर्यंत त्यांनी सर्व कामे केली. ही सर्व कामे करत असताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले. त्यांनी माय, बाप दागिना, जात, मामाची पोरगी, आठवण माझी काढत जा तू, तिच्या घरात ती काय करत असेल, यासारख्या सदाबहार कवितेचे गायन केले. सहजता सुलभता, सोपेपणा व लयबद्धता हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य दिसून आले. सोप्या शब्दातून त्यांनी आपल्या जीवनाचे गाणे मांडले. आपल्या आईने दिलेली शिकवण सांगताना ते म्हणतात

'माय म्हणायची रोज

मुका घेऊन कपाळी

बाळा ज्याची खावी पोळी

त्याची वाजवावी टाळी'

बापानं शिकवलेला स्वाभिमान त्यांनी 'बाप' या कवितेतून मांडला. प्रेम भावना, प्रेम जाणिवा व्यक्त करणाऱ्या त्यांनी अनेक कविता सादर केल्या. 'मामाला माझ्या होत्या दोन पोरी

एक होती काळी एक होती गोरी'

या कवितेतून मामा, मामाच्या मुली, त्यांचा लाभलेला सहवास त्यांनी यातून शब्दबद्ध केला. या कवितेचा आस्वाद घेताना प्रत्येकाला आपला मामा आणि मामाची पोरगी नक्कीच आठवली असेल. त्यांचं पहिलं प्रेम, तिचा लाभलेला सहवास आणि गरीबीमुळे झालेली ताटातूट याचे चित्रण करताना ते म्हणतात-

'तिच्या घरात ती आता काय करत असेल

थोडी सरत असेल थोडी उरत असेल'

अशी प्रेम जाणीव ते व्यक्त करतात. प्रेम भावनेला मोकळी वाट करून देतात. दागिना या कवितेतून त्यांची अर्धांगिनी, सहचारिणी प्रेमळ पत्नीची दागिने विषय समजूत काढताना त्यांनी तिचं सौंदर्यही टिपले आहे.

त्यांच्या कवितेतील सुलभता, सोपेपणा, नाद सौंदर्य, ग्रामीण शब्दकळा या मुळेच कवी इंद्रजित भालेराव यांनी माझ्या कवितेचा वारसदार संतोष नारायणकर म्हणून त्यांचा गौरव केला आहे. या कविता वाचनाचा आस्वाद संस्थाध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, डॉ. एम.बी.पाटील, संतोष रणखांब, प्रा.डॉ.बाळासाहेब काळे, डॉ.साहेबराव सोनसळे, प्रा. सखाराम कदम, प्राध्यापकवृंद भाषाप्रेमींनी घेतला.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)

या कविता वाचनाचा आस्वाद संस्था अध्यक्ष परमेश्वर कदम, प्राचार्य डॉ वसंत सातपुते, डॉ.पाटील एम. बी.,



## माझ्या जीवनाचं गाणं माझी कविता – संतोष नारायणकर

## आज निश्चित मराठी भाषा सापडणे दुरापास्त – डॉ. पंढरीनाथ धोंडगे

जेथे स्वच्छतेचा अभाव तेथे कोरोनाचा प्रभाव

रणखांब संतोष, प्रा. डॉ. बाळासाहेब काळे, डॉ.साहेबराव सोनसळे, प्रा. सखाराम कदम, प्राध्यापकवृंद भाषाप्रेमीनी घेतला.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व्याख्यानमाला**

**दिवस सहावा**

***<u>मराठी भाषेला समृद्ध भक्ति संप्रदायाने केले - डॉ.दत्ता शिंदे</u>***

सोनपेठ : येथील कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ येथे 14 जानेवारी ते 28 जानेवारी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा संपन्न होत आह. त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. आज सहावे पुष्प गुंफतांना संत तुकाराम महाविद्यालय, परभणी येथील मराठी विभाग प्रमुख व संशोधक, मार्गदर्शक डॉ. दत्ता शिंदे यांनी 'संत साहित्याचे मराठी भाषेला योगदान' या विषयावर व्यक्त होताना वरील उद्गार काढले.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar
(ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani (MS)